# G. G. DANDEKAR MACHINE WORKS LTD.

DANDEKAR™
Built to Last

Ref No.: GGD/Sec./2022/05/11
Date: May 31, 2022

BSE Scrip Code: **505250**

To
Corporate Relationship Department
BSE Limited
1st Floor, P. J. Towers
Dalal Street, Fort,
Mumbai – 400 001

Dear Sir/Madam,

**Subject: Copies of Notices of published in the Newspapers**

Pursuant to Regulation 30 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations 2015, please find enclosed copies of notice published in the Free Press Journal (English) and Mahasagar (Marathi), requesting the Members to register email address in order to receive Notice of Postal Ballot and details of e-voting through email.

You are requested to take the same on record.

Thanking You

Yours Faithfully,
For **G. G. Dandekar Machine Works Limited**

Sayalee Yengul
**Company Secretary**

Encl: As above

# कोरोनामुळे अनाथ झालेल्या ७९ बालकांना १५ लाखाच्या पॅकेजचे वितरण

**नागपूर, दि. ३० :** तुमच्या आयुष्यात झालेली दुर्घटना जीवनात अंध:कार निर्माण करणारी आहे. मात्र यातून सकारात्मकवृत्तीने बाहेर पडणे आवश्यक आहे. शासन तुमच्या कायम पाठिशी आहे. निराश न होता पुढील मार्गक्रमण करा, आकाशी झेप घ्या, असे भावनिक आवाहन केंद्रीय महामार्ग व दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांनी आज येथे केले. कोरोना महामारीमध्ये ज्यांचे आई-वडील मृत्युमुखी पडले अशा अनाथ बालकांसोबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव कार्यक्रमातंर्गत ऑनलाईन संवाद साधला. जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवनात जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनात महिला व बाल कल्याण विभागाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनानंतर जिल्ह्यातील अनाथ बालकांशी श्री. गडकरी यांनी संवाद साधला. नागपूर जिल्ह्यात दोन्ही पालक गमावलेल्या बालकांची संख्या ७९ आहे. त्यांना आज जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात पंधरा लाखाचे पॅकेज मंत्री महोदयांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी व्यासपीठावर आमदार विकास कुंभारे, टेकचंद सावरकर, जिल्हाधिकारी आर.विमला, महिला व बाल विकास विभागाचे विभागीय उपायुक्त रवी पाटील उपस्थित होते.

यावेळी बोलतांना त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अतिशय जिव्हाळ्यातून ही योजना आणली आहे. मुलांना त्यांच्यासोबत घडलेल्या अघटीतातून बाहेर काढण्यासाठी, निराशेतून प्रकाशाकडे नेण्यासाठी, संकटावर मात करुन यशस्वी होण्यासाठी, अतिशय बारकाईने ही योजना आखण्यात आली आहे.

# नागपुरात चोरट्यांचा सुळसुळाट

## हुडकेश्वरमध्ये तासात पाच घरफोड्या पोलिसांचा वचक नाहीच : बाहेरगावी जायचे कसे? नागरिकांमध्ये दहशत

**नागपूर :** शहरातील घरफोड्यांचे सत्र वाढतच असून दररोज यासंदर्भातील प्रकरणे समोर येत आहेत. विशेषत: शहराच्या आऊटर भागातील नागरिकांमध्ये यामुळे दहशत निर्माण झाली आहे. हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत तर २४ तासातच पाच घरफोड्यांची नोंद झाली. चोरांकडून कुलूप लावलेल्या घरांना टार्गेट करण्यात येत असून, पोलिसांकडून गंभीरतेने गस्त होते की नाही, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

गजाननगर येथील विजय राघोर्ते हे कुटुंबीयांसह २८ मे रोजी लग्नाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी बाहेरगावी गेले. २९ मे रोजी मध्यरात्री दीडनंतर ते घरी पोहोचले. घराच्या प्रवेशद्वाराचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत होते. घरातील विविध खोल्यांमधील कपाटेदेखील उघडली होती व सामान अस्ताव्यस्त पडले होते. राघोर्ते कुटुंबीय लग्नाला गेल्याने बहुतांश दागिने घेऊनच गेले होते व घरात रोखदेखील कमी होती. चोरांनी २३ हजार रुपयाचा माल लंपास केला. परंतु या घटनेमुळे कुटुंबाला प्रचंड धक्का बसला आहे.



### चंद्रपूर मनपा अधिकाऱ्याचे घर टार्गेट

दुसरी घटना इंदिरानगर सूर्यकिरण सोसायटी येथे घडली. चंद्रपूर महानगरपालिकेचे अधिकारी प्रकाश बांते यांच्या पत्नी प्रियंका या मुलगा व मुलीसह २३ मे रोजी नागपुरातीलच त्यांच्या आईकडे राहायला गेल्या होत्या. घराला त्या व्यवस्थितपणे कुलूप लावून गेल्या होत्या. त्या घरी परत आल्या असता घरातील सामान फेकलेले होते व चोरांनी दागिने व इतर सामान मिळून ३८ हजाराचा माल चोरून नेला

### केदारनाथला गेलेल्या सासूकडे चोरी

महात्मा गांधीनगर, न्यू नरसाळा रोड येथील वंदना घोडसे या १७ मे रोजी केदारनाथ येथे दर्शनासाठी गेल्या. त्यांच्या अनुपस्थितीत त्यांचे जावई संजय देवगीरकर व त्यांचा मुलगा त्यांच्या घरी चकरा मारून नियमितपणे तपासणी करीत होते. दोन दिवसाअगोदर त्यांचा मुलगा अभ्यासासाठी गेला असता घरातील कुलूप व साखळ्या तुटलेल्या दिसून आल्या. तातडीने देवगीरकरदेखील तेथे पोहोचले. सासू नसल्याने नेमका किती माल चोरी गेला आहे, हे लक्षात आले नाही. सासूशी फोनवर संपर्क झाल्यावर पोलिसात तक्रार नोंदविण्यात आली.

### सतर्कतेमुळे वाचले लाखोंचे दागिने

घराबाहेर जात असताना दागिने, रोख रक्कम सुरक्षित ठिकाणी ठेवावी, असे वारंवार पोलिसांकडून सांगण्यात येते. मात्र लोक त्याचे पालन करत नाहीत. पाच गुन्ह्यांपैकी दोन प्रकरणात फिर्यादींनी रक्कम व दागिने घरी ठेवले नव्हते. त्यामुळे त्यांचे जास्त नुकसान झाले नाही.

### मनपा कर्मचाऱ्याच्या सासूचे घर लुटले

इंद्रनगर येथील निवासी अपर्णा येवले या त्यांच्या नातेवाईकांकडे राहायला गेल्या होत्या. त्यांच्या शेजाऱ्यांनी घरात चोरी झाल्याची माहिती दिली. त्यानंतर येवले यांचे जावई व मनपातील कर्मचारी जितेश धकाते हे तेथे पोहोचले. सासूशी फोनवर संपर्क करून त्यांनी नेमका किती माल चोरी गेला

### मेट्रो कर्मचाऱ्याचे घर फोडले

न्यू अमरनगर निवासी व मेट्रोतील कर्मचारी जगदीश नागपुरे हे कुटुंबीयांसह महाराष्ट्र दर्शनाला गेले असता त्यांचे घरदेखील चोरट्यांनी फोडले. झाडाला दररोज पाणी टाकण्याची जबाबदारी त्यांनी काम करणाऱ्या महिलेवर सोपविली होती. एका सायंकाळी महिला पाणी टाकण्यासाठी गेली असता, शेजाऱ्यांनी घराचे कुलूप तोडल्याचे सांगितले. याची सूचना मिळाल्यावर नागपुरे परतले. बाहेरगावी जाण्याअगोदर त्यांनी रोख रक्कम व दागिने नातेवाईकांकडे ठेवले होते. तरीदेखील त्यांच्या घरातील हजाराचा माल चोरीला गेला.

# आज लाभार्थी परिसंवाद कार्यक्रम

- प्रधानमंत्री व मुख्यमंत्री साधणार संवाद
- बचत भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन

**नागपूर, दि. ३० :** भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीस ७५ वर्ष पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून केंद्र व राज्य शासनाच्या वतीने देशभरात आझादी का अमृत महोत्सवांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या धर्तीवर शासनाने लाभार्थ्यांसोबत परिसंवाद कार्यक्रम आयोजित केला आहे. तीन सत्रात होणाऱ्या या कार्यक्रमामध्ये सकाळी ९.०० वाजता जिल्हा प्रशासनाचा कार्यक्रम होणार आहे. सकाळी ९.४५ वाजता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे विविध लाभार्थ्यांशी ऑनलाईन संवाद साधणार आहे. तर सकाळी ११ ते दुपारी १२ पर्यंत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी लाभार्थ्यांशी ऑनलाइन संवाद साधणार आहेत.

पहिल्या सत्रात सकाळी ९ ते ९.४५ या कालावधीत जिल्हा प्रशासनाच्या कार्यक्रमामध्ये विविध योजनांच्या लाभार्थ्यांसोबत मान्यवरांचा संवाद होणार आहे. वरिष्ठ अधिकारी यावेळी मार्गदर्शन करतील. तसेच शासनाच्या विविध अहवाल, यशोगाथा, पुरस्कारांचे प्रकाशन सकाळी ९.४५ पर्यंत केले जाणार आहे.

दुसऱ्या सत्रात सकाळी ९.४५ ते १०.४५ या कालावधीत राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांशी संवाद साधणार आहे. नागपूर जिल्ह्यातील तीन लाभार्थी उद्या मुख्यमंत्री महोदयांसोबत त्यांना मिळालेल्या विविध योजनांच्या लाभाबद्दल मनोगत व्यक्त करणार आहे. मा.मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाने हा कार्यक्रम १०.४५ वाजता संपणार आहे.

तिसऱ्या सत्रात सकाळी १०.५० ते दुपारी १२.१० या कालावधीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दूरदृष्यप्रणालीद्वारे हिमाचल प्रदेशातील सिमला येथील आयोजित राष्ट्रीय कार्यक्रमाद्वारे राज्य, जिल्हास्तरावर स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबियांसह १३ योजनांच्या निवडक लाभार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. या सत्राचा समारोप प्रधानमंत्र्यांच्या संबोधनाने होणार आहे.

नागपूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवनात जिल्ह्यातील विविध योजनेतील लाभार्थी या तिनही सत्रातील कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. लाभार्थ्यांसोबतच केंद्र व राज्य सरकारचे मंत्री, खासदार, आमदार, महापौर, स्थानिक स्वराज्य संस्थांचे अध्यक्ष आणि जिल्हा परिषद अध्यक्षांना या कार्यक्रमात निमंत्रित करण्यात आले आहे. दरम्यान जिल्हाधिकारी आर. विमला यांनी आज सर्व विभाग प्रमुखांचा आढावा घेतला. त्यामध्ये ग्रामीण भागातून येणाऱ्या लाभार्थ्यांच्या व्यवस्थेबाबत त्यांनी निर्देश दिले.

मंगळवारी होणाऱ्या या कार्यक्रमात प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, पोषण अभियान, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, स्वच्छ भारत अभियान, जलजीवन मिशन, प्रधानमंत्री स्वनिधी योजना, एक राष्ट्र एक राशन कार्ड, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, आयुष्मान भारत योजना, आरोग्य योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजनांसोबतच राज्य शासनाच्या कृषी, सिंचन, आरोग्य व वैयक्तिक लाभाच्या योजनावर उद्या संवाद साधला जाणार आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतींमध्ये विविध सोशल मीडीया व्टिटर, फेसबुक, युट्युब आदी चॅनेलवर हा कार्यक्रम लॉईव्ह प्रसारित करण्यात येणार आहे.

# दोन चिमुकल्यांना वाऱ्यावर सोडून जन्मदात्रीचे पलायन

**नागपूर :** दोन चिमुकल्यांना वाऱ्यावर सोडून त्यांची जन्मदात्री निघून गेली. अवघ्या दीड आणि तीन वर्षे वय असलेल्या या दोघी नीट बोलू शकत नाही अन आईवडील अथवा ईतर नातेवाईकांबाबत माहितीही देऊ शकत नाही. मात्र, खुद्द आईच रेल्वेस्थानकावरच्या फलाटावर शोधून पळ काढल्याने त्या दोघी बहिणी कावऱ्याबावऱ्या झाल्या आहेत.

२६ मेच्या पहाटे १.३० वाजता दीड वर्षाची पिंकी, तसेच तीन वर्षांची कीर्ती येथील मध्यवर्ती रेल्वेस्थानकाच्या फलाट क्रमांक एकवर सैरभैर अवस्थेत चाईल्ड लाईनच्या सदस्यांना दिसल्या. सदस्यांनी त्यांच्या जवळ जाऊन आईवडिलांबाबत विचारणा केली असता त्या व्यवस्थित माहिती देऊ शकल्या नाही. त्यामुळे चाईल्ड लाईनच्या सदस्यांनी त्यांना लोहमार्ग पोलीस ठाण्यात (जीआरपी) आणून सोडले. पोलिसांनी रेल्वेस्थानक परिसर आणि फलाटावर या दोन मुलींच्या पालकांना शोधण्याचा प्रयत्न केला. अनेकांकडे विचारपूसही केली. मात्र, त्यांची माहिती पोलिसांना उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे पोलिसांनी नंतर फलाटावरचे सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले. त्यात एक महिला या दोन मुलींना फलाटावर सोडून निघून गेल्याचे दिसून आले. ही महिला कोण, कुठली आणि ती कुठे आहे, ते स्पष्ट न झाल्यामुळे पोलिसांनी या दोन मुलींना श्रद्धानंदपेठेतील खासगी बालगृहात दाखल केले.



### पोटच्या मुलींना तिने असे बेवारस का सोडले?

सीसीटीव्हीत दिसणारी महिला अत्यंत गरीब कुटुंबातील दिसते. रस्त्याच्या बाजुला फुटपाथवर अथवा अशाच कोणत्याही ठिकाणी ती राहत असावी, असा अंदाज प्राथमिक चौकशीनंतर पोलिसांनी बांधला आहे. मात्र, तिने आपल्या पोटच्या मुलींना असे बेवारस का सोडले, ते स्पष्ट झाले नाही. ती हाती लागल्यानंतरच या प्रश्नाचे उत्तर मिळणार आहे. रेल्वे पोलीस त्या महिलेचा शोध घेत आहेत.

रक्तातून एचआयव्हीचा संसर्ग प्रकरण

# चौकशीसाठी पाच सदस्यांची समिती

**नागपूर :** रक्तातून एचआयव्हीचा संसर्ग झाल्याचे प्रकरण पुढे येताच खळबळ उडाली आहे. याची चौकशी करण्यासाठी उपसंचालक आरोग्य विभागाच्यावतीने आता पाच सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली असून साधारण एक आठवड्यात ही समिती आपला अहवाल सादर करणार आहे.

नागपुरातील किती मुलांना रक्तपेढीतील रक्तातून एचआयव्हीची लागण झाली याचा नेमका आकडा अद्याप पुढे आलेला नाही. मात्र, थॅलेसेमियाबाधित तीन वर्षांच्या चिमुकलीच्या आईने आठ महिन्यांपूर्वी रक्तपेढीतून उपलब्ध रक्तातून एचआयव्हीचा संसर्ग झाल्याची व इतरही काही मुले बाधित असल्याचे सांगितले. त्याच्या चौकशीसाठी उपसंचालक आरोग्य विभागाने पाच सदस्यांची समिती स्थापन केली आहे. यात दोन सदस्य एमडी पॅथोलॉजिस्ट, अन्न व औषध प्रशासन (एफडीए) नागपूर येथील दोन औषधी निरीक्षक व सेंट्रल एफडीए येथील एक औषधी निरीक्षकाचा समावेश आहे. साधारण एक आठवड्यात ही समिती आपला अहवाल सादर करण्याची शक्यता आहे.




# युपीएससी परीक्षेत नागपुरातील तीन विद्यार्थ्यांनी रोवला झेंडा



**नागपूर :** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला. यात महाराष्ट्रासह उपराजधानीच्या निकालाचा टक्का वाढला आहे. भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र नागपूरमधून सहा उमेदवारांनी मुलाखती दिल्या होत्या. यातील तीन उमेदवारांनी या परीक्षेत बाजी मारली असून यशाचा झेंडा फडकविला आहे. शुभम भैसारे (९७), सुमीत रामटेके (३५८) आणि शुभम नगरारे (५६८) अशी या यशस्वी विद्यार्थ्यांची नावे आहेत.

गेल्या वर्षी केंद्रीय लोकसेवा आयोग (युपीएससी) नागरी सेवा परीक्षा २०२० ची मुख्य मुलाखत फेरी २ ऑगस्ट ते २२ सप्टेंबर २०२१ या कालावधीत घेण्यात आली होती. त्यानंतर २४ सप्टेंबर २०२१ रोजी अंतिम निकाल जाहीर करण्यात आला. या वर्षी मुलाखतीची प्रक्रिया २६ मे २०२२ रोजी संपली. त्यामुळे युपीएससी, सीएसई २०२१ चा अंतिम निकाल सोमवारी जाहीर होण्याची अपेक्षा व्यक्त केली होती. यात नागपूरच्या भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रातील तीन विद्यार्थी पात्र ठरले होते. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल केंद्राचे संचालक डॉ. प्रमोद लाखे यांनी समाधान व्यक्त केले. तसेच प्रशिक्षण केंद्रामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत होत असल्याचेही ते म्हणाले.

### उप लोकायुक्त संजय भाटिया आज घेणार सुनावणी

नागपूर: राज्य उप लोकायुक्त संजय भाटिया हे उद्या मंगळवारी (दि. ३१ मे) रविभवन येथे त्यांच्यासमोर आलेल्या विविध विषयांवरील प्रकरणांवर सुनावणी घेतील. त्यानंतर रात्री रविभवन येथे मुक्काम आणि बुधवारी (दि. १ जून) नागपूर येथून रात्री साडेनऊ वाजता मुंबईकडे प्रयाण करतील.

### कालचा शुभांक

| | | |
|---|---|---|
| मणिपूर | 459-8 | 890-7 |
| कल्याण | 260-8 | 178-6 |
| राजधानी | 118-0 | - |
| कुबेर | 470-1 | - |
| खजाना डे | - | - |
| नागपूर मार्निंग | - | - |



### नागपुरात भाविकांनी केला सूर्यपुत्र शनिदेवाचा अभिषेक

**नागपूर :** सूर्यपुत्र शनिदेवाच्या जन्मोत्सवानिमित्त शहरातील शनी मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. भाविकांनी शनिदेवाचा तेलाने अभिषेक केला. पहाटे ४ वाजता मंदिराचे पट उघडण्यात आले. त्यानंतर भगवान शनिदेवाचा श्रृंगार करण्यात आला. सकाळी ८ वाजता महाआरती करण्यात आली. दुपारी १२ वाजता शनिदेवाचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. सोमवारी शनी जयंतीनिमित्त सर्वार्थ सिद्धी योग सकाळी ७.१२ ते रात्री ११.३९ पर्यंत राहिला. अभिजीत मुहूर्त दिवसा ११.५१ वाजेपासून दुपारी १२.४६ वाजेपर्यंत राहिला.

## जी.जी.दांडेकर मशीन वर्क्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** २११/ए, मऔविमं बुटीबोरी औद्योगिक क्षेत्र, गाव किन्ही, तालुका हिंगणा, जिल्हा नागपूर – ४४११२२; **सीआयएन:** एल७०१००एमएच१९३८पीएलसी००२८६९, **इमेल:** cs@ggdandekar.com, **वेबसाईट:** www.ggdandekar.com, **दूरध्वनी:** +९१(०७१०३)२९५१०९

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की **जी.जी.दांडेकर मशीन वर्क्स लिमिटेडचे** ('कंपनी') टपाली मतदान दिनांक ४ जून, २०२२ (भाप्रवेनुसार सकाळी ९.००) ते ३ जुलै, २०२२ (भाप्रवेनुसार सायंकाळी ५.००) या कालावधीदरम्यान टपाली मतदानाच्या सूचनेत नमूद केलेल्या कामकाजाकरिता कंपनी कायदा, २०१३ ('कायदा') च्या तरतुदी व त्याअंतर्गत बनविण्यात आलेले नियम व त्यातील सुधारणांसह सहवाचिता कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेली साधारण परिपत्रके क्र. १४/२०२० दिनांकित ८ एप्रिल, २०२०, क्र. १७/२०२० दिनांकित १३ एप्रिल, २०२०, क्र. २२/२०२० दिनांकित १५ जून, २०२०, क्र. ३३/२०२० दिनांकित २८ सप्टेंबर २०२०, क्र. ३९/२०२० दिनांकित ३१ डिसेंबर २०२०, क्र. १०/२०२१ दिनांकित २३ जून, २०२१, क्र. २०/२०२१ दिनांकित ८ डिसेंबर, २०२१ आणि क्र. ३/२०२२ दिनांकित ०५ मे, २०२२ (यापुढे सामुदायिकरित्या 'एमसीए परिपत्रके' म्हणून संबोधित करण्यात येतील) व सेबी (सुचीबद्धता बंधने व प्रकटन आवश्यकता) अधिनियम, २०१५ यांच्या अनुपालनार्थ आयोजित करण्यात आले आहे.

उपरोक्त एमसीए परिपत्रकांच्या अनुपालनार्थ, कंपनीच्या टपाली मतदान सूचनेच्या इलेक्ट्रॉनिक प्रती केवळ इमेलद्वारे अशा सर्व सभासदांना पाठविण्यात येतील ज्यांचा इमेल पत्ता (पत्ते) कंपनीकडे किंवा रजिस्ट्रार व ट्रान्स्फर एजंट (आर व टी एजंट) म्हणजेच लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांकडे किंवा त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स (डिपी) कडे नोंदणीकृत असेल. सदर सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर www.ggdandekar.com येथे आणि जेथे कंपनीचे समभाग सूचीबद्ध आहेत अशा स्टॉक एक्सचेंजेसच्या संकेतस्थळावर म्हणजेच बीएसई लिमिटेड www.bseindia.com येथे उपलब्ध असेल. या टपाली मतदानाकरिता सभासदांना टपाली मतदान अर्ज व प्रिपेड व्यावसायिक प्रतिसाद लिफाफा यांसह टपाली मतदान सूचनेची प्रत्यक्ष प्रत पाठविण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सभासद इ-मतदान सुविधेद्वारे मत देऊ शकतात. इ-मतदानासाठीच्या सूचना टपाली मतदान सूचनेत नमूद करण्यात येतील.

वरील बाबींच्या दृष्टीने, सभासदांना विनंती आहे की उपरोक्त टपाली मतदान सूचना व इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मत देण्यासाठी लॉगिन आयडी व पासवर्ड प्राप्त करण्यासाठी त्यांनी आपला इमेल पत्ता (पत्ते) किंवा त्यातील बदल, जर काही असल्यास, लवकरात लवकर नोंदवावा. डिमटेरिअलाइज्ड स्वरुपात भागधारणा असणाऱ्या भागधारकांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे इमेल पत्ते व मोबाईल क्रमांक त्यांच्या डिपॉझिटरी पार्टीसिपंट्सच्या माध्यमातून त्यांच्या संबंधित डिपॉझिटरीजकडे नोंदवावेत. प्रत्यक्ष स्वरुपात भागधारणा असणाऱ्या भागधारकांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे इमेल पत्ते व मोबाईल क्रमांक कंपनीकडे ir@ggdandekar.com येथे किंवा त्यांच्या आर व टी एजंट म्हणजेच लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडकडे pune@linkintime.co.in येथे सादर करावेत.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**जी.जी.दांडेकर मशीन वर्क्स लिमिटेड करिता**
स्वाक्षरी
**सायली येन्गुल**
कंपनी सचिव

**दिनांक:** ३० मे, २०२२
**ठिकाण:** नागपूर

## Bandhan Bank

रीजनल ऑफिस: नेताजी मार्ग, मिठाकली सिक्स रस्त्यांजवळ, एलिसब्रीज, अहमदाबाद-06. फोन: +91-79-26421671-75

### प्रतीकात्मक ताबा सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की सेक्युरिटायझेशन अँड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 या अधिनियमांतर्गत आणि कलम 13(12), सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचून त्याअन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन, प्राधिकृत अधिकाऱ्याने खालिल खात्यासमोर नमूद दिनांकेला मागणी नोटिस कर्जदार निर्गमित केली असून त्यात कथित सूचना मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत ती रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती. कर्जदारांनी कर्जाची परतफेड न केल्यामुळे याद्वारे कर्जदारांना, आणि सर्वसाधारण जनतेला नोटिस देण्यात येते की खाली सही करणाऱ्याने येथे खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा, कथित ॲक्टचा सेक्शन 13(4) हा, कथित नियम 8 सह वाचला असता त्याखाली त्याला दिलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली दिलेल्या खात्यासमोर निर्देशित केलेल्या तारखेला घेतलेला आहे. याद्वारे कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला मालमत्तेसंबंधात कोणताही व्यवहार न करण्याचा सावधगिरीचा इशारा देण्यात येत आहे आणि मालमत्तेबाबत करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा रक्कम, व्याज, खर्च आणि शुल्कसाठी बंधन बँक लिमिटेडच्या प्रभारांच्या आधीन असेल. प्रतिभूत मत्ता सोडवून घेण्यासाठी, उपलब्ध वेळेच्या संबंधात, अधिनियमाच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे/मोर्टगेजरचे लक्ष वेधण्यात येत आहे.

| कर्जदाराचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक | मालमत्तेचे वर्णन (सुरक्षित मालमत्ता) | मागणी नोटिसेची दिनांक | प्रतीकात्मक ताबा दिनांक | मागणी सूचनेच्या दिनांकेला थकित रक्कम |
|---|---|---|---|---|
| श्री. धिरेंद्र यादवराव निमसडे<br>श्रीमती रीना धिरेंद्र निमसडे<br>509/1291 | प्लॉट क्र. 165, ग्रामपंचायत घर क्र.5272, पीएच क्र.46, खसारा क्र.197 (नवीन), मौजे- वानाडोंगरी हिंगणा, तालुका हिंगणा, जिल्हा नागपूर येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे: उत्तर: रस्ता, पूर्व: प्लॉट क्र. 165/ए, पश्चिम: प्लॉट क्र. 166, दक्षिण: प्लॉट क्र. 136 | 28.12.2021 | 25.05.2022 | रु.5,07,101.37 |
| श्री. प्रमोद अझाजी वानखेडे<br>श्रीमती प्रज्ञा प्रमोद वानखेडे<br>501/6270 | खसारा क्र.153/1 (जुना) 11 (नवीन), प्लॉट क्र. 29, पीएच क्र.46, मौजे निलडोह, तालुका हिंगणा, जिल्हा नागपूर, महाराष्ट्र-440016 येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे: उत्तर: रस्ता, पूर्व: मोकळी जमीन, पश्चिम: प्लॉट क्र. 28, दक्षिण: प्लॉट क्र. 44 | 23.02.2022 | 25.05.2022 | रु.18,90,660.71 |

स्थळ: नागपूर
तारीख: 31/05/2022

अधिकृत अधिकारी
बंधन बँक लिमिटेड

